**एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम २०१५-१६**
**गतिमान पध्दतीने पाणलोट विकसित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गपावि-२०१५/प्र.क्र.५९३/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ११ डिसेंबर, २०१५

वाचा :- शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
१) क्रमांकः .जलसं १०९५/प्र.क्र.२५०/जल-७, दिनांक ३० जानेवारी, १९९६.
२) क्रमांकः आदर्श २००७/प्र.क्र.१२१/जल-७, दिनांक ३० नोव्हेंबर, २००७.
३) क्रमांकः जलसं २००८/प्र.क्र.५६/जल-७, दिनांक ११ एप्रिल, २००८ व दि.१७ एप्रिल, २००८.
४) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांकः असक-२०१३/प्र.क्र.१५/जल-११, दिनांक १४ मे, २०१३.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांकः जलसं २०१३/प्र.क्र.१/जल-७, दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ व दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३.
६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांकः जलसं २०१३/प्र.क्र.१०६/जल-७, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४.
७) वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प /३, दि.१७ एप्रिल २०१५.

**प्रस्तावना:**

पाणलोट विकासाचे सदृष्य परिणाम अल्प कालावधीत दिसून येण्यासाठी सन २००७-०८ मध्ये राज्यातील ३५३ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यात १ पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्याचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्याच धर्तीवर सन २००८-०९ ते सन २०१४-१५ मध्ये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत अपूर्ण पाणलोट प्रकल्पाधारित पध्दतीने पूर्ण करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांतर्गत सन २००७-०८ पासून ३२४३ सुक्ष्म पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण १९.२९ लाख हेक्टर क्षेत्र उपचारित झाले असून त्याचे दृष्य परिणामही दिसून येत आहेत.

२. आता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत अपूर्ण पाणलोट प्रकल्पाधारित व गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम ही योजना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत संदर्भाधीन दि. ३० नोव्हेंबर, २००७ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीप्रमाणे राज्यातील प्रगतीपथावरील अपूर्ण पाणलोट प्रकल्पाधारित पध्दतीने गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर पूर्ण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. याकरिता डिपीडिसी, विघयो, टीएसपी, ओटीएसपी व राज्यस्तरावर निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

२. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम सन २०१५-१६ मध्ये गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर अपूर्ण पाणलोट प्रकल्पाधारित पध्दतीने पूर्ण करण्यासाठी राज्यस्तरावर रु. २८००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी वित्त विभागाच्या दि. १७ एप्रिल, २०१५ च्या परिपत्रकानुसार रु. १९६०.०० लक्ष निधी वितरणास उपलब्ध आहे. सदर अर्थसंकल्पित निधी मधून सोबतच्या **परिशिष्ट अ** प्रमाणे रू. १६००.०० लक्ष निधी मा. राज्यपाल महोदयांच्या वैधानिक विकास मंडळनिहाय सुत्रानुसार वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. हा निधी संबंधित जिल्हयांना वितरित करण्यासाठी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच हा निधी संबंधित जिल्हयांना वितरित करण्यास आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर निधी जलयुक्त शिवार अभियातंर्गत निवडलेल्या गावातील अपुर्ण सुक्ष्म पाणलोट पुर्ण करण्यासाठी उपलब्ध करून दयावा. पाणलोटाची निवड जिल्हाधिकारी यांच्या सहमतीने करावी. उपलब्ध निधीतुन सुक्ष्म पाणलोट पुर्ण होईल याची दक्षता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घ्यावी. निवड करण्यात आलेला सुक्ष्म पाणलोट सुकाणू समितीमधील नसेल तर त्यास सुकाणू समितीची कार्योत्तर मान्यता घ्यावी.

५. या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या उपरोक्त कामांसाठी झालेला खर्च हा खालील लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

**"मागणी क्र.एल-७, ४४०२-मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, १०२-मृदसंधारण - १०२ (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, १०२ (०१) (०१) मृदसंधारणाच्या उपाययोजनांद्वारे जमिनीचा विकास - (४४०२ ०१९७) ५३, मोठी बांधकामे.".**

६. उपरोक्त मंजूर केलेला निधी ज्या प्रयोजनासाठी वितरित करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याची जबाबदारी आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. मंजूर केलेल्या निधीतून झालेल्या कामांचा मासिक प्रगती अहवाल न चुकता शासनास सादर करावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे संदर्भाधीन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/ अर्थसंकल्प-३, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१११३४२१०००२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae7faeabaf4571c2748e4dd5ffd2cd108de0e130859970f4d7d0ee40046b3e9e, cn=Narayan Karad
Date: 2015.12.11 17:22:39 +05'30'

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

**( ना. श्री. कराड )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव,
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई.
९. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,
१०. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे,
१३. सर्व विभागीय आयुक्त,

१४. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
१५. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१८. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
१९. सर्व जिल्हाधिकारी,
२०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२१. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२२. सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२३. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२५. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
२६. सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण,
२७. सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उप वनसंरक्षक,
२८. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
२९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३१. सर्व मंत्रालयीन विभाग,
३२. सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी, जलसंधारण विभाग (खुद्द) मंत्रालय, मुंबई,
३३. निवडनस्ती जल-७.

**परिशिष्ट अ**

**शासन निर्णय क्र : गपावि -२०१५ / प्र.क्र.५९३/जल-७ चे सहपत्र**

| विभाग | अ.क्र. | जिल्हा | वितरणासाठी प्रस्तावित रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| अमरावती | १ | यवतमाळ | ६८.०० |
| | २ | अमरावती | ४२.०० |
| | ३ | अकोला | ३३.०० |
| | ४ | बुलडाणा | ५५.०० |
| | ५ | वाशिम | ३३.०० |
| | **एकूण** | | **२३१.००** |
| नागपूर | १ | भंडारा | १४.०० |
| | २ | वर्धा | ३५.०० |
| | ३ | नागपूर | ५२.०० |
| | ४ | गोंदिया | १६.०० |
| | ५ | चंद्रपूर | ३६.०० |
| | ६ | गडचिरोली | २५.०० |
| | **एकूण** | | **१७८.००** |
| औरंगाबाद | १ | नांदेड | ५६.०० |
| | २ | हिंगोली | २९.०० |
| | ३ | परभणी | ३६.०० |
| | ४ | जालना | ४५.०० |
| | ५ | औरंगाबाद | ४९.०० |
| | ६ | लातूर | ४३.०० |
| | ७ | उस्मानाबाद | ४६.०० |
| | ८ | बीड | ५८.०० |
| | **एकूण** | | **३६२.००** |
| नाशिक | १ | नंदूरबार | २९.०० |
| | २ | धुळे | ५२.०० |
| | ३ | जळगाव | ९४.०० |
| | ४ | नाशिक | ९३.०० |
| | ५ | अहमदनगर | ११३.०० |
| | **एकूण** | | **३८१.००** |
| कोकण | १ | ठाणे | ११.०० |
| | २ | रायगड | १८.०० |
| | ३ | रत्नागिरी | १९.०० |
| | ४ | सिंधुदुर्ग | १४.०० |
| | ५ | पालघर | २०.०० |
| | **एकूण** | | **८२.००** |
| पुणे | १ | पुणे | ८०.०० |
| | २ | सोलापूर | ११४.०० |
| | ३ | सातारा | ८७.०० |
| | ४ | कोल्हापूर | २८.०० |
| | ५ | सांगली | ५७.०० |
| | **एकूण** | | **३६६.००** |
| **एकूण राज्य** | | | **१६००.००** |